प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत.
डॉ. शैलेश पेठे,सहाय्यक आयुक्त पसं

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन आदेश क्र.पसंप्र-२०१५/प्र.क्र.१९०/पदुम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ७ जानेवारी, २०१६

वाचा :- १) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव) पश्चिम,मुंबई यांचे पत्र क्र. कक्ष-७/आस्था/३१६/ २०१५-१६,दि. २४.८.२०१५

२) सहआयुक्त पशुसंवर्धन(मुख्यालय) पुणे यांचे पत्र क्र.राजप/१(प्रतिनियुक्ती) (पशुवैद्यकीय अधिकारी)/१२०५/२०१५/पसं-२, पुणे-७, दि.८.१०.२०१५

शासन आदेश :-

डॉ.शैलेश गुरुनाथ पेठे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकीत्सालय,भिवंडी,जि.ठाणे यांची, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली (पश्चिम) मुंबई-९१ येथील पशुवैद्यकीय अधिकारी, या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ) डॉ. पेठे, ज्या तारखेला प्रतिनियुक्तीच्या पदावर रुजू होतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल. त्यानंतर तीन वर्षांचा कालावधी हा अथवा त्यापूर्वी ते प्रतिनियुक्तीच्या पदाचा कार्यभार सुपूर्द करुन त्यांच्या मूळ विभागात ज्या तारखेला रुजू होतील त्या तारखेला त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी समाप्त होईल.

आ) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापुर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार विभागाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

इ) जर त्यांची सेवा स्वीयेत्तर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेत्तर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठविण्यापुर्वी स्वीयेत्तर नियोक्त्याने या विभागास तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे.

ई) डॉ.पेठे, यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला /सक्षम प्राधिकाऱ्यांला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

२. प्रतिनियुक्तीच्या कालावधीत डॉ.पेठे, यांना प्रतिनियुक्ती भत्ता देय असणार नाही.तसेच म.ना.से. (पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा...इ) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट दोन) मधील तरतूदी विचारात घेऊन महसुल व वन विभाग (वने) तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव) पश्चिम,मुंबई यांनी प्रतिनियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती, आपापसात सल्लामसलत करुन ठरवाव्यात.

३. डॉ.पेठे, यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी महसूल व वन विभाग (वने) तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव) पश्चिम,मुंबई यांच्या मार्फत हाताळण्यात येतील. डॉ. पेठे यांना प्रतिनियुक्तीच्या पदावर हजर होण्यासाठी पर्यायी व्यवस्था करुन आयुक्त पशुसंवर्धन यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inयां संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१६०१०७१३५३१७८२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Shashank Madhav Sathe

Digitally signed by Shashank Madhav Sathe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11a06bf85893554ac5cded657c0f1435af29a0ad118fb759493176e40002b178, cn=Shashank Madhav Sathe
Date: 2016.01.07 13:55:01 +05'30'

(श. मा. साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग (वने),मंत्रालय,मुंबई-३२
२. आयुक्त पशुसंवर्धन,पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव) पश्चिम,मुंबई
४. मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली (पूर्व) मुंबई- ४०० ०६६.
५. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, (मुख्यालय) पुणे
६. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,मुंबई विभाग,मुबई.
७. जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन,ठाणे
८. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन,जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकीत्सालय,भिवंडी (शेलार) जि.ठाणे.
९. अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रे (पुर्व) मुंबई.५१
१०. जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे.
११. डॉ.शैलेश पेठे,सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, यांना (आयुक्त पशुसंवर्धन,पुणे यांचे मार्फत.)
१२. निवड नस्ती.